प्रकरण 6 वे

'उपसंहार'

पृष्ठ क्र. 51 ते 56

# * प्र क र ण – 6 वे *

## उपसंहार

सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी प्रवर्तिलेल्या पंथाला महाराष्ट्रात महानुभावपंथ, बुंदेलखंडात अच्युतपंथ, पंजाब व अफगाणिस्थानांत जयकृष्णीपंथ म्हणून ओळखतात. कित्येक ठिकाणी महात्मापंथ या नावाने तो प्रसिद्ध आहे. क्वचित् भटमार्ग व परमार्गही त्यास म्हणतात. अशा या महानुभाव पंथाने आपल्या समृद्ध व सुंदर वाड्.मयीन संपदेने मराठी साहित्य मंदीरामध्ये फार मोलाची अशी भर घालून मराठी वाड्.मय वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच प्राचीन मराठी साहित्यामध्ये महानुभाव वाड्.मयाचा सिंहाचा वाटा आहे असे म्हटले जाते.

समग्र मराठी सारस्वतामध्ये बाईदेवबास/भावेब्यास यांच्याकडे एक महानुभावीय ग्रंथकार म्हणून दृष्टिक्षेप टाकला असतां, एक गोष्ट सहजच लक्ष वेधते. ती म्हणजे त्यांच्या नावावर असणारी सर्व वाड्.मयीन संपदा ही गद्य स्वरुपातच आहे.

बाईदेवांच्या वाड्.मयीन रचना महानुभावीय शास्त्राला मोहकता आणतात. भाषा मधुर आहे. कधी – कधी प्रासात्मकही बनते. व प्रासाच्या माध्यमातून ती उत्कृष्ठ रेखाचित्र रेखाटते. अलंकारानी नटलेली नसून साधीसुधीच पण विलक्षण प्रभावी व प्रवाही असून ग्रंथरचनांना वाड्.मयीन सौंदर्य प्राप्त करुन देण्यास ही भाषा समर्थ ठरते.

ग्रंथामधील दृष्टान्ताची यथायोग्य मांडणी, स्थानांचे तपशिलाने वर्णन, चक्रधरांची दैनंदिनी, मूर्तीचे ध्यान, वंदन, नामस्मरण या विशेषांनी याचबरोबर सुलभ भाषायोजना, ओघवती प्रवाही शैली, भूगोल व तत्वज्ञानाची बैठक लीळामधिल तपशीलस्थाने देताना न सोडणे या अनेकांगी गुणांमुळे बाइदेवबासांचे वाड्.मय आपले वेगळेपण दर्शविते.

महानुभाव पंथातील महत्वाचे मानलेले ग्रंथ उदा. 'लीळाचरित्र' तसेच 'स्मृतिस्थळ' यामध्ये बाइदेवांचे उल्लेख किंवा स्मृती फारच तुरळक आहेत. यावरुन ते फारच अबोल व चिंतनशील असावेत असे वाटते.

महानुभावीय इतर साहित्यामध्ये देखिल बाइदेवबासांचा म्हणावा तेवढा बोलबाला झालेला दिसून येत नाही. मात्र त्यांचे वाड्.मय अभ्यासाच्या व वाड्.मयाच्या दृष्टीने फार मोलाचे असलेले दिसून येते.

बाइदेवबासांच्या वाड्.मयीन रचना अभ्यासल्या असतां त्यांची भाषा जिवंत व प्रवाही आहे हे समजतेच शिवाय चक्रधरांवरची त्यांची परमभक्ती व त्यांना लाभलेले चक्रधर सन्निधान सहजच डोळयासमोर उभे राहते. संवादाची नाटयमयी अशी उत्कृष्ट रचना त्यांनी आपल्या रचनेत केली आहे. उपमा, अनन्वय आणि दृष्टान्त यासारखी सौभाग्यलेणी भाषेने परिधान केलेली आहेत. प्रसादगुणांची भाषेला देणगी असून वर्णनांचा अचूकपणा व अपांडित्यही तिच्यात असलेले दिसून येते. भक्तीलाच जणू व्यक्तिमत्व त्यांनी आपल्या वाड्.मयीन रचना लिहून प्राप्त करुन दिले आहे.

वरील विवेचनावरुन बाइदेवबास चरित्र व वाड्.मय यांचा मी अभ्यास केलेला आहे हे पटेल. हा अभ्यास करताना प्रथम प्रस्तुत अभ्यासाची भूमिका स्पष्ट केली आहे त्यात 'बाइदेवबास चरित्र व वाड्.मय' हा विषय मला का घ्यावासा वाटला याचे विवेचन करुन महानुभाव वाड्.मय गद्याच्या दृष्टीने मराठी साहित्य किती महत्वाचे मानले जाते हे सांगून बाईदेवबासांच्या वाड्.मयाचा 'एक ग्रंथकाराचा अभ्यास' कसा मोलाचा ठरेल हे विशद केले आहे.

प्रास्तविक व पूर्वाभ्यासाचे स्वरुप सांगताना 'बाइदेवबासांच्या चरित्र व वाड्.मय अभ्यास करताना कोणत्या गोष्टींकडे कटाक्षानेलक्ष पुरविले आहे हे निवेदन केलेले आहे त्यात यापूर्वीच्या अभ्यासाचे स्वरुप स्पष्ट करुन प्रस्तुत अभ्यासाची दिशा स्पष्ट केली आहे.

'बाइदेवबासचरित्र आणि व्यक्तिमत्व' मध्ये त्यांचे चरित्र आणि व्यक्तिमत्व फुलविताना अनेक घटना मांडून ते साकारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू त्यामधून दिसले आहेत. त्यात त्यांच्या वाड्.मयीन रचना पंथीय प्रार्थनेत दैनंदिन जीवनातील नित्यपाठाचे महनीय साधन म्हणून प्रधान मानल्या आहेत.

'बाइदेवबासांच्या वाड्.मयाचे स्वरुप व माहात्म्य सांगताना त्यांच्या वाड्.मयीन कलाकृतींचा स्वतंत्रपणे व विस्तृतपणे आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये

1) प्रसादसेवा.

2) पूजावसर.

3) मूर्तिज्ञान.

4) नामाचे दहा ठाय.

या चार रचना अंतर्भूत आहेत. 'प्रसादसेवे' मध्ये अंतर्भूत होणाऱ्या वस्तूंचे प्रमुख नऊ प्रकार बाइदेवबासांनी दिलेले आहेत. त्यात 1) कापूस 2) कोसला 3) रोम 4) दात 5) काष्ट 6) लोह 7) पाखाण 8) कातडे 9) धातू. त्या वस्तू म्हणजे प्रसाद होय. त्या नऊ प्रकारातील अनेक वस्तूंचा उल्लेख सहजगत्या पण मार्मिकपणे बाइदेव करतात. प्रसादवस्तूंचा तपशील प्रसादाचे ठिकाण, प्रसाद प्राप्तीचा प्रसंग व त्या अनुषंगाने एखादी लीळा व प्रसाद प्राप्तीचे कारण या गोष्टींची उत्तम सांगड बाइदेवांनी या रचनेत घातली आहे. या वर्गीकरण व वस्तूनिर्देशावरुन बाइदेवांचा पंथीय अनुभव, अधिकार आणि पंथीय तत्वज्ञानावरील त्यांचे असणारे प्रभुत्व लक्षात आल्याशिवाय रहात नाही. प्रसादाची गोडी असणारी ही 'प्रसादसेवा' अत्यंत छोटेखानी परंतु अर्थाच्या दृष्टीने महान अशी वाड्.मयीन कलाकृती आहे.

'पूजावसरात' "श्रीचक्रधरांना" पहाटे जाग आल्यापासून तो रात्री झोपेपर्यंतचा त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाचा तपशील दिलेला आहे. ही रचना सुद्धा आकाराने लहान पण तिचे वाड्.मयीन सौंदर्य महान आहे. प्रातःकाल, मध्यान्हकाल व सायंकाळ अशा त्रिकाल होणाऱ्या पूजावसराच्या वर्णनाचा भाग मोठा आकर्षक आहे. जागृती, अवस्थान, वसति, आसन, शौच, मुखमार्जन, शिष्यांनी केलेले करचरण वंदन, चक्रधरांचे दंतमंजन, स्नानविधी क्षौरकर्म – वस्त्र – प्रावरण, धर्मवार्ता निरुपण, पूजावसर वर्णन, आरोगण, वामकुक्षी, वेठेसतपदी, विहरण प्रवृत्ती, धर्म शिक्षापण, श्रमदान – परोपकार – क्रीडापण त्याली पद्मासन व सयनासन आदींचा समावेश यात होतो. 'पूजावसरात चरित्रकथन आहे पण पाल्हाळ नाही. सूक्ष्म निरीक्षण, निवेदनातील सरसता, नेत्रगोचरता, बोलके प्रसंग या गुणविशेषांनी पूजावसराचे लेखन समृद्ध झालेले आहे. समर्पक शब्दयोजना, छोटी धावती वाक्ये, बोली भाषेचा वापर, तत्कालीन शब्दवैशिष्ठये दर्शविणारे शब्द यांचे रसायनच पूजावसरात सापडते. डोळयासमोर प्रसंग उभा करण्याची ताकद 'पूजावसरा' तून जास्तीत जास्त ध्यानामध्ये येते.

हुबेहुब वर्णन करण्याची त्यांची हातोटी 'मूर्तिज्ञानात' परिचित होते. प्रसादसेवे सारखेच परमेश्वरावताराच्या मूर्तीचे व त्याने केलेल्या नानाविध क्रीडांचे ध्यान करणे हा सुद्धा महानुभाव पंथीयांच्या प्रार्थनेचा एक विशेष समजला जातो. परमेश्वराच्या सगुण उपासनेला यामध्ये महत्व दिले आहे. बाइदेवबास महानुभाव पंथीय तत्वज्ञानाने किती परिपूर्ण होते याची कल्पना 'मूर्तिज्ञान' अभ्यासताना प्रामुख्याने येते. श्रीचक्रधरांच्या क्रीडांचा संक्षेप मूर्तिज्ञानात केलेला दिसतो. मूर्तिज्ञानामध्ये व्यक्तिवर्णन, स्थलवर्णन, पोशाख विशेष, अन्नविशेष याचा एक क्रम दिसून येतो. संवादमयी असे हे लेखन असून वाक्प्रचारांचाही वापर केलेला दिसून येतो. चक्रधरांचे सावयव वर्णन व प्रत्येक अंगप्रत्यंगाच्या अनुषंगाने एखाद्या लीळेचे व एखाद्या भक्ताचे स्मरण इ. गोष्टी मूर्तिज्ञानात उत्कटतेने लक्षात येतात. बाइदेवांची श्रीचक्रधरांवरची परमभक्ती व त्यांना लाभलेले श्रीचक्रधर सन्निधान त्यांच्या वाड्.मयीन रचनामधून देखिल प्रत्ययास येते. "नामाचे दहा ठाय" मध्ये परमेश्वरनामाचे श्रेष्ठत्व गायिले आहे. परमेश्वरावताराच्या मूर्तिस्मरणापेक्षाही नामस्मरण अधिक श्रेष्ठ होय. असे यात सांगितले आहे. कारण मूर्तिस्मरणात नामस्मरण येत नाही. पण नामस्मरणांत मूर्ति स्मरणाचा अंतर्भाव असतोच त्यामुळे नामस्मरणाने मूर्तिस्मरण आपोआपच होते. नामस्मरणाने सत्यज्ञान होते, अनुसरण होते, विघ्नहरण होते, परमेश्वर प्राप्ती होते. याठिकाणी ठायीचा अर्थ ठिकाणी असा आहे. परमेश्वराच्या नामस्मरणाच्या संदर्भात दहा ठिकाणी भक्तांना नामस्मरणाचे श्रेष्ठत्व दर्शविणारे दहा दृष्टान्त देखील कथन केलेले आहेत. बाइदेवाच्या अनन्यनिष्ठेस व भक्तीस हे नामाचे दहा ठाय शोभणारे आहेत. यामध्ये नामाचे श्रेष्ठत्व इतके बिनतोड कथन केले आहे की, पंथीयांना हे नामाचे दाहा ठाय नित्यपाठात अंतर्भूत करावे लागले. बाइदेवोबांची ही रचनाही इतर रचनेप्रमाणे महानुभावांच्या नित्यपाठात जाऊन असली आहे. यातच त्याचे श्रेष्ठत्व सामावलेले दिसते. त्यांच्या सर्वच रचनांमध्ये छोटी धावती वाक्यरचना आहे. प्रसंग चक्षूसमोर उभी करणारी अशी चित्रात्मकता आहे. उद्‌बोधन व मनोरंजनाचा मिलाफ ही त्यांच्या रचनेत दिसतो. निखळ भक्तीच्या प्रेमापोटी 'पूजावसर', 'मूर्तिज्ञान', 'प्रसादसेवा' व 'नामाचे दहा ठाय' हे ग्रंथ निर्माण झाले. त्यांच्या या सगळयाच वाड्.मयीन रचना प्रार्थना स्वरुपाच्या आहेत. परमेश्वराच्या आनंदमय स्वरुपाची प्राप्ती हे त्याचे ध्येय असून ज्ञानप्रेमाचे उपाय ही मुख्य साधने होत. ही साधने आचरताना चित्तशुद्धीसाठी पावित्र्याचा प्रसाद प्राप्त करुन घेण्यासाठी मूर्तिध्यान, प्रसादसेवा, नामस्मरण, पूजावसर या वाड्.मयाच्या

सहाय्याने प्रार्थना करणे बाइदेवांना अगत्याचे वाटते. प्रार्थनेत अनादि दोषांमुळे अभिलाषा, अहंता, ममता कामक्रोधादिकांमुळे जीवस्वरुपावर प्रत्यही चढणा-या अपवित्रतेपासून आपली सूटका व्हावी यासाठी तळमळ व्यक्त झाली आहे. चारही रचनांमधून श्रीचक्रधरांचा संपूर्ण जीवनपटच आपल्या सुंदर शब्दशिल्पातून बाइदेवबासांनी कोरलेला आहे. त्यामध्ये कुठेही पाल्हांळ वा कृत्रिमता नाही. अतिशय मार्मिकतेने व सहृदयतेने त्यांनी आपले वाड्.मय सहजसुंदर शैलीमध्ये साकारले आहे. एक मात्र ध्यानात घ्यावे लागेल की, त्यांच्या उपलब्ध अव्यक्त चरित्रातून व चार छोटया वाड्.मयीन कलाकृतीतून साहजिकच् व्यक्त होणारी त्यांची "श्रीचक्रधरांवरची अनन्यभक्ती" कोणीही नाकारणार नाहीच उलट त्यांच्या चक्रधरांवरील अनन्य भक्तीला प्रणाम करण्यासाठी मन भरारी मारेल.

बाइदेवांनी पंथामधील स्वतः जे प्रत्यक्ष पाहिले अनुभवले ते सौंदर्य पखरून मांडण्याचा प्रयत्न आपल्या लेखन वाड्.मयात केलेला आहे. भावमधूरतेने नटलेले त्यांचे वाड्.मय लेखकाच्या मनोमुकुरातुन प्रतिबिंबीत झालेले आहे. वास्तव अनुभवाच्या पायावर उभारणी झालेली ती नवनिर्मिती आहे. त्यामध्ये चैतन्य व मानवी अंतःकरणाचा आविष्कार आहे. अंतरीचा पंथामधिल सौंदर्यानुभव शब्दरूप होऊन साकार केलेला आहे. परमेश्वराच्या नामाचे महात्म्य सांगुन त्यांनी आपल्या साहित्यामधून शाश्वत विचार मांडलेला आहे. त्यांच्या साहित्यातील त्यांची गुरूवरील प्रीती व पंथावरील निष्ठा पाहून अत्युच्च व निरामय असा आनंद होतो. अमंगळाचा नाश व्हावा या विचाराने प्रार्थना करावी या हेतूनेच त्यांनी अंतर्बाह्य शुध्द होण्यासाठी आपल्या वाड्.मयीन रचना रचल्या. पूर्वानुभवांचा आधार घेऊन सत्यसृष्टीतील वस्तू, व्यक्ती व घटनांना लेखकाने नव्या शैलीने " पुजावसर, मूर्तिज्ञान, प्रसादसेवा व नामाचे दहा ठाय, मधून दृष्टोत्पत्रीस आणून दिली आहेत ती त्यांच्या भाषेने संवादरचनेने व यथायोग्य मांडणीमुळे नवनिर्मिती ठरलेली आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये त्यांच्या चार ही वाड्.मयीन कलाकृतींचे माहत्म्यदेखिल बारकाईने व विस्ताराने स्पष्ट केले आहे. नंतरच्या प्रकरणात बाइदेवांच्या वाड्.मयाचे विशेष उदाहरणासहित सांगितले आहेत. अशाप्रकारे बाइदेवबासांच्या चरित्र व वाड्.मयाचा साकल्याने उहापोह झाल्यानंतर असे म्हणता येईल की, त्यांच्या वाड्.मयीन कामगिरीने महानुभाव वाड्.मय अर्थात मराठी वाड्.मयामध्ये चांगल्या लेखनाची भर पडली आहे. अकृत्रिम, जिवंत, दृष्टान्तात्मक, प्रवाही, प्रभावी, व अपांडियुक्त असे त्यांचे लेखन व बोलीभाषेची समृध्दता तसेच वाक्यप्रचारांचा वापर असलेले वाड्.मय महानुभावपंथाची स्वतःची अशी खास वैशिष्टये

दर्शविते त्यावरून महानुभावपंथाचे आचरण व दैनंदिन कार्यक्रम यांचे विस्ताराने व नेमके ज्ञान होण्यास मदत झाली आहे. त्या पंथात नक्की आहे काय? नियम व कोणती उपासना आहे? त्याचे अचूक ज्ञान बाइदेवबासांच्या वाङ्.मयीन संपदेने मराठी अभ्यासकांना समजू शकते. अर्थात् महानुभावपंथाची सुत्रेच चितारली आहेत. मराठी साहित्यातदेखिल त्यांच्या वाङ्.मयाच्या रूपाने कलात्मक व गुणात्मक अशी वाङ्.मयीन सौंदर्याची भरच पडलेली आहे.

उपलब्ध माहिती व पुस्तकां आधारे बाइदेवबासांचे प्रबंधिकेत केलेला आहे. तो परिपूर्ण असेलच असे नाही. यातही काही त्रुटी राहील्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. इतर अभ्यासकांनाही हा विषय अभ्यासण्यास अजुनही वाव आहे. मात्र प्रस्तुत प्रबंधिकेत सलगपणे बाइदेवबासचरित्र व ग्रथंरचना अभ्याकांसमोर नेमके पणाने मांडण्यांचा प्रयत्न केलेला आहे. तो अभ्यासकांना आवडेल अशी आशा आहे. त्यात काही त्रुटी असण्याची शक्यता आहे. संदर्भाच्या मर्यादांमुळे अशी त्रुटी राहू शकते. शिवाय संशोधनात कोणताही शब्द अखेरचा नसतोच ।

# परिशिष्टे

क्र. 1 ते 6

पृष्ठ क्र. 57 ते 81

## परिशिष्ट – 1

### प्रसाद सेवा संहिता

श्रीपरेशाय नमः । ब्रह्मस्वरुप : देओ : आनंदस्वरुप : चीदघनस्वरुप : देओ : तो : परमेश्वरु : अव्यक्तू : श्रुष्टीमध्ये अवतरौनि : जीवू : उधरावया तोंचि एकु समर्थु त्याचि साधन समर्थ त्याचि साधनाचे च्यारि पक्ष : स्थान : प्रसादु : वासनकू : भीक्षु : हें अतीगहनाचें गहन : परिज्ञया पासौनि : आसन : वसति : अवस्थान : पुजा : आरोगण : पहुडू : उपहुड : चरणचारी उभयां ठाकणें : एणें : जाणें : हें धेयावें : घोकावे : नमस्कारावें : हेचिं केवि ना : गोसावी : भटोबासातें : भणीतले : एथचेया संबंधा : गेले : तेतुले : वोटे गोटे आदिकरुनि : तुम्हां नमस्कारणीये कीं गा : मा एसणी देमती कैसी डावलीली : आणि : गोसावी : इंद्रभटांसि : खडकुलीए : फुटा दीधला : तेव्हळि : इंद्रभटातें : भणीतले : इंद्रया हा पुजावसरीं काढीजें : पुष्प एक वाइजे : नमस्कारु कीजे : सकृत कीजे : अती एत्न कीजे : हें देखीले तैसे आठवीजें : या तव : संबंधु : नमस्करीजे : ।। आतां विखयसंबंध पदार्थांची नांवे : साधीजतें असीजती ।। कापुस ।।1।। कोसला ।।2।। रोम ।।3।। चर्म ।।4।। धातु ।। 5।। दांत ।।6।। काष्ट ।। 7।। पाखाण ।।8।। आतां मूर्तिनिष्ट पदार्थ : नख 11। दाढ 12। केशकलापु 13। आनुलेपन 14। या मुर्तिनिष्टा : पदार्था : माझे : दंडवत : कापुसांतु : अवघीं सूताउवें वस्त्रें आली : आंगी : टोपरें बहीवासू : फुटा : पडदणी : पावसडा: उदास्याची दुटी : परसनाएक दुटी : गदोनाएकाची जाया : त्याचे वस्त्र : दोन्हीं कर डखले : गोगोचें वस्त्र : कू–हे मातांगाची त्रीवडि : गोखीचे वस्त्र : द्रावीडदेसीचे वस्त्र : जोगनाएकाचें वस्त्र : उत्तरी : जानिवें पवीतें : नवया माचयाचा पाटू : जुनया माचयाचा पाटू : सूपवतीएचा रु : हे मूख्य जेतुलेयां वस्त्रां पूजा जालीं : तेतूलीं वस्त्रे कापुसाआंतु बोलीजति : तया वस्त्रसंबंधासि माझे दंडवत ।।*।। आतां कोसलेया आंत समग्र पाटाउवें आली : बारवेची दुटी : म्हाइंभटाची मेघवर्णी दुटी : मेघवर्णी पाग : सोनेसळा फुटा : जगळदरणेंयाची रामदरणेंयाची त्रीवडि : दामोर्ताची त्रीवडि क्षीरोदक फुटा : सारणेंरा फुटा : म्हाळाइबांचीया वस्त्राची धारी : गरुडनीळदुटी : या पाटाउवां : वस्त्र संबंधासि : माझें दंडवत : ।।*।। आतां रोमे आंतु : पांचवर्णी जाडि : सोरठा जाडी : चवरी : घोंगडे : सकलादेंचे टोपरें : हें मुख्य करुनि जेतुलेयासि रोमांसि संबंधु जाला : तेतुलेयांसि माझे दंडवत ।।*।। चरमा आंतु : चरण गादी : पाट गादी : दांडियेचा बोखारु : ओसाडि : पाखाल : पोहरा : काकोचा करवता : सागळ : उपान्हौ : हे मुख्य करुनि : जेतुलिया चर्मासि संबंधु : जाला : त्यासि माझे दंडवत ।।*।।

धातु आंतु : वांकि : सांखळें कांबि : पालिमांडे : आर्ति : थाळा : ताट : वाटी : आरीसा : लोहो : गंगाळ : तांभाण : दोन्ही तांब कळस : आबिनाथीचें तांबे : चौरंगाचे लोहो : माहाद्वारीचेया कवाडाचें लोहो : राजमठीचेया कवाडाचे लोहो : काकोचेया करवताचे लोहो : केशवनाएकाचेया पव्हेचें लोहो : हें मुख्य करुनि जेतुलेयां धातुसि सबंधु जाला : तेतुलेयांसि : माझे दंडवत ।।*।। दाता आंतु सेंद कापुराची : फणी : हें मुख्य करुनि जेतुलेया दातांसि संबंधु जाला : तेतुलेयांसि माझे दंडवत ।।*।। काष्टा आंतु : आऊसाचें पात्र : डोमेग्रामीचेया राजमठाचा खांबू : डोंबेग्रामीचया राजमठीचा उंबरवटु : नवा माचा : मांचळी : पाटु : चौरंगु : महाद्वारीचे कवाड : राजमठीचें कवाड : भाणवतीचे कवाड : त्रीपुरुषमठींचे कवाड : केशवनाएकाचेया माळवधाचें कवाड : साळेंचे कवाड : बारवें केशवीचे कवाड : नेउरगावींचे बाळाणें : फणी : दोन्ही एमलार्जुन : हें मुख्य करुनि जेतुलेया काष्टासि संबंधु जाला : तेतुलेयांसि माझे दंडवत ।।*।। पाषणा आंतु मोतीयांचा टीळा : छीनस्थळी : माहाद्वारीचा उंबरवटू : सोपान : भीति : भांडेभेदन ; राजमठीचा उंबरवटु : आरोगण स्थानीचा खांबू : ओटा : गुढा : खडकुलीएचे खडक : हें मुख्य करुन जेतुलया पाषाणांसि संबंधु जाला : तेतुलेया माझे दंडवत ।।*।। ऐसा दोही देवांचा संबंध वंदीजे : सेवीजे : तरि : प्रसाद सेवे तव काइ होए : ना : गोसावी : डोंबेग्रामी औदास्याची प्रवृत्ति अंगीकरीली : तेव्हळी : गोसावीयांचीये दृष्टी समोरु : कव्हणाही रीगवेना : तेव्हळी : भटोबासी श्री प्रभूगोसावीयांची : प्रसादाची दुटी : दाखऊनि वीनवीलें : जी : जी : श्रीप्रभुगोसावीयांची प्रसाददुटी जी : स्वीकरीजो जी : आणि गोसावीया प्रावर्ण केली : आणि सर्वज्ञे भणींतले : ऐसे होए गा : ऐसे हें तुम्हा काइ म्हणौनि : स्फुरले : ऐसे होए : विधि करीतां वीधि स्फुरें : वीधि अविधि परिहरें मग : या उपरि : गोसावी प्रसादाची महीमा नीरोपीली : सर्वज्ञें भणीतलें : प्रसाद सेवे तव पुरुषू धर्मी दक्ष होई : ईश्वरी आर्ति उपजे : अविधि परिहरे : वीघ्नां उपशांति होए : वीधी सबीज होए : दैव साह्यातें करी : अविधि अनीष्टाचा नाशु करी : तामसे काळीं सत्वा ए : गेले सत्व ए : सन्निधान देयावयाची प्रवृत्ति : जए जए जी : ईश्वरा : श्रीचक्रधरा : सश्चितानंद स्वरुपा देवा : मी आनादिचा अपवीत्रु गा : श्रीचक्रधरा : आज्ञानें : अन्यथाज्ञानें अपवीत्रु : सोक्ति : शास्त्रोक्ति : लोकोक्ति : अपवीत्रु : अहंता ममता अपवीत्रु : कामक्रोधी अपवीत्रु : मदुमच्छरी अपवीत्रु राग द्वेषीं अपवित्रु : आणि : श्रुष्टाश्रुष्टीचा प्रमादीया : गा : श्रीचक्रधरा : आतां ए

सृष्टीमध्ये : तु : एकु वांचौनि : आणि काइसेनहीं : पवीत्र नव्हे गा : जी चक्रधरा : आपुलेनि दर्शने स्पर्शनें : संभासणें आवलोकनें : अंतष्करणे : मातें अपवीत्रतें : पवीत्र कीजो गा श्रीचक्रधरा ।। तुझें नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा : अवस्थान : प्रसादु : वासनीकु : भीक्षु : यांचे सेवादास्य घडउनि : मातें अपवात्रातें पवीत्र कीजो गा श्रीचक्रधरा : आपुला नीत्यवीधी नीमीत्यवीधी घडउनि अपवीत्रातें पवीत्र कीजो गा जी श्रीचक्रधरा ।। तुझेया स्थाना : प्रसाद : वासनीका : भीक्षुसी माझें दंडवत ।। परीश्रयाचीये ठाउनि आसन : वसति : अवस्थान : वर दीधले : त्या त्या माझे दंडवत ।। वोवीपासौनि वचन : वर दीधले त्या त्या माझे दंडवत ।। शाब्दज्ञानी : अपरोक्षज्ञानी : सामान्यज्ञानी : वीशेखज्ञानीयासि माझे दंडवत ।। आठाइ भक्तासिं : माझे दंडवत : पुरभजनीया : विषयप्रेमीया : आग्रहीया : तळमळीया : आत्मघ्ननीया : अवस्थाप्रगट टीया (उपाइचा) : आइकत खेओ जाए : या आठाहीं भक्तासिं माझे दंडवत : उपकारनीमीत्यासि माझे दंडवत : अशेखा गुरुकुळासि माझे दंडवत एवं प्रसादेसवा समाप्त ।।*।।

***

## परिशिष्ट– 2

### पूजावसर संहिता

श्रीपरेशायनमः नीत्यदीनीलीळा : कव्हणीं कव्हणे ठाई बोलेति : कव्हणीं कव्हणे ठाई बोलेती : कव्हणीं ठाई कांही वीसेखु : कव्हणीं ठाई कांही वीसेखु : ते अवघे वीसेखु डोंबेग्रामी : म्हणौनि : बाईदेवोबा नित्यदीनी लीळा : डोंबेग्रामी बोलेति : डोंबेग्रामी तीनि मठ : एकू पूर्वभिमुख : एकू उत्तराभिमुख : एकू दक्षीणाभिमूख : तीये दक्षीणाभिमुखे राजमठी : गोसावीयासि अवस्थान : रीगतां डावेया हाता : पसीमीली भींतीसीं : उत्तरदक्षीण ओटा : तया ओटेयावरि : गोसावीयासि : पहूडु होए : बाईसें उपाहानौ पालवें गुंडौनि : आपुलेया उसीसी : कां आडवांगी ठेविति : पाईतेयाकडे खाली नीजेति : पस्यात पाहारी : गोसावीयासि उपहुड होए : लोंबता श्रीचरणी आसन होय : इखीति खांकरिति : बाईसे : सूजगरे होति : साउमां एति : श्रीचरणा लागति : श्रीचरणी उपाहानौ आळगवीति : दुसरेया श्रीचरणा लागति : श्रीचरणी उपानौ आळगवीति : बाईसे : पुढे जाति : कवाडाची खीळी फंडीति : तवं भटोबास उबरा उसीसें करुनि वीसंबले असति : स्थालेयाचे चाऱ्ही मास भातरि नीजति : ऊंबरा उसीसे करिती : उन्हाळे पाउसाळे बाहीरि नीजति : उंबरा उसीसे करीति : गोसावी दोन्हीं दारसंका दोही श्रीकरी धरुनि एकू श्रीचरणु वक्षेस्थळावरि ठेवीति : एकू उंबरवटावरि ठेवीति : (परशुराम) : उपानौ परीत्यजौनि ठेवीति : (रामेश्वर) : उपानौ सहीत ठवीति : भटोबासा जाडय आलें असे : गोसावी : श्रीचरणीचेनि आंगुठेनि वक्षेस्थळ दाटीति : भट जागे होति : श्रीचरण हृदइ धरीति आळंगीति : लल्हाटावरि ठेवीति : नमस्कारीति : मोमे देति : दुसरा श्रीचरणु मागति : हृदइं धरीति : आळंगीति : लल्हाटावरि ठेवीति : नमस्कारीति : मोमे देति : ऐसे वीळास करीति : भटोबासांसि सूख थोर होए : तथा सूखा परिमाण कव्हणीचि नेणे : तेया सूखा परिमाण भटोबासचि जाणति : श्रीचरणु काही केलेया सोडुं न सकेति : गोसावी : वाड वेळू एकें श्रीचरणे उभे असति : आणि परिश्रयाची प्रवृत्ति म्हणौनि सांडीति : कदाचीति : बाईसे : म्हणति : सोडि सोडि नागदेवा : बाबसि उसीरु होतु असे : मग : सोडीति : आधीली दीसी भटोबासी टोळे दोनि आणुनि ठेवीले असति : ते सरीसे घेति : जगतींचा दारवठा दक्षीणाभिमुख : त्या पसिमीलीकडे परिश्रयस्थान : गोसावी : उत्तरदक्षिण परिश्रया वैसेति : भटोबास टोळे पासि ठेउनि : इतुकेया

एका दुरि जाउनि बीदी बैसति : एरीकडे बाईसे दीपू उजळेति : मढू झाडिति ओटयावरी सयनासन असे : ते पद्मासन रचीति : उस्णोदकाची तांब्तौली : बहीरवासाची घडी : घेउनि दारवठां उभी असति : गोसावी । परिश्रयो सारुनि उभे होति : भटोबास साउमे एति : बाईसे : भटोबासांचा हातीं उस्णोदकाची तांब्तौली : बहीरवासाची घडी देति : भटोबास : गोसावीयासि : ओळगवीति : कदाचीत भटोबासां जाडय आले असे : तरी : बाईसेचि ओळगवीति : गोसावीयासि : उस्णोदका बिनियोग होए : चोखटु वहीरवासू वेढीत भीतरि बीजें करीति : आसनी उपवीष्ट होति : बाइसे पालवे श्रीचरण परिमार्जिति : आसनावरी ठेवीति : दुसरा श्रीचरणु पालवें परिमार्जिति : आसनावरि ठेवीति : गोसावी : आसनी उपवीष्ट होती : तव एरीकडे भटोबासां जाडय आले असे : ते परीहरे : गोसावीयातें नेदेखति : आणि धांव घेति : शब्दापसि शब्दु थोरु : बाइ बाइ : गोसावी : एथ बीज केलें असे : बाईसे म्हणति : हें काइ नागदेया एव्हडेया वेळा बाबातें कें वीसंबलासि : आणि धाव घेति : पाहावेया नीगति : गोसावी : म्हणेति : बाइ रात्रि वडील असे : एवढया वेळा बापूडें वानरें कें जाइल : बोलावा आरौता ऐसा : गोसावीयाचा शब्दु आइकेति आणि एति : कदाचित बाइसे म्हणेति : ये : नागदेया : बाबा : एथ आले असति : कदाचीति : गोसावी : म्हणति यागा वानरेया : हें एथ आले असे : भटोबास एति : श्रीचरणा लागति : पासि बैसति : समस्त भक्तजने एति : श्रीचरणा लागति : पासि बैसति : गोसावीयासि नीरुपणाची प्रवृत्ति असे : तरी : गोसावी निरुपण करीति ना : रात्रि वडील असे : तरि पहुडु होए : ना तरि आसनि नीश्चलु बैसति : बाईसे प्रस्नु करीत : जी जी : आम्ही गोसावीयाते : चिंतु : गोसावी : काइ चींतीति : गोसावी : म्हणती : बाई : हें सकल : जीवातें चींती : कदाचीत : बाइसें : प्रस्नु करीति : बाबा आम्ही बाबाते चींतु : बाबा काइ चींतीति : बाइ : हें श्रीप्रभुची थापु चींती : तवं : अरुणोदयो : होए आधीली दिसीं भटोबा सींभीलका दोनि आणुनि ठेवलीया असति : आंबीयाचीया : बाभळेचीया : कदाचीत बोरोचीया : या दोन्ही गोसावीया : श्रीकरीं ओळगवीती : गोसावीयाची : एकि जानू वरि ठेवीति : एकी दंतधावन करीति : दंतधावन करुं सरे : ते परी त्यजीति : दुसरी घेति : ते डावीये श्रीकरीचेया आंगुठयेचिनि नखे : चीरुनि दोनीं फेडि करीति : एकि आंगुळीयां मध्ये धरीति : एकी धनुषाकार वळीति : त्या जिव्हामळ आकर्खिती : जीव्हामळ आकर्खु सरे : आणि परीतेजीति दुसरी घेति : तेही : धनूषाकार वळीति : जीव्हामळ

आकर्खिती : जीव्हामळ आखर्खू सरे : आणि परीत्यजीति : बाइसे पालमंडे उस्नोदकाची तांब्तौली आणीति : मग : गोसावीयासि : "सौंदरा श्रीकरी गुर्जरापरी : गुळळा होए : श्रीमुख प्रक्षालन होए । श्रीकर प्रक्षाळिति : बाईसे श्रीकरी सपूरु दाटणा ओळगाविती : श्रीमूख परमार्जीति : बाईसे श्रीचरणा प्रक्षाळीति : पालवें परमार्जीति : आसनावरि ठेवीति : दुसरा श्रीचरणु प्रक्षाळीति : पालवें परमार्जीति : आसनावरि ठेवीति : चरणोदक असे तें समस्ता भक्त जनां प्रसादु होए : तेथ उदकाचे बींदु बींदु पडले असति : ते पालवे परमार्जीति : तेथ दोनि पद्में रेखीतिः बाइसे बाहीरि जाति : हात पाय धूति : तोंड धूति : सोवळे : वस्त्र वेढीति : भटोबास गोपीचंदन उगाळिति : बाइसे गोसावीयांचा भालप्रदेशी गोपीचंदनाचा उर्धपौंड्रटीळा रेखीति : कोण्हीं उपाधी स्थूळ आले असति : तरि गोसावी : आपूलेया पदीत्रा आंगुळीया करुनि रेखीति : दोन्ही रेखा सरसीयाचि एति : आधीलां दीसीपुष्पे आणुनि : वोला दाटणां गुंडूनि ठेवीली असति : तो गळदंडा श्रीकंठी ओळगवीति : श्रीमुगुटीं मुगुटमाळ मोकळयां पूष्पांची पूजा करीति : श्रवणी झुलंबुके : बाहु भूषणे : कळीयांचे हातसर : श्रीकरी फुलांचा झेला ओळगवीति : धुपटणा आंगारा आणीति तयावरी दसांग धूप घालीति : बाइसे पाचैं वाती उजळीति : आर्ती पालमांडा ठेवीति : गोसावीयासि : धुपार्ती होए : मंगळार्ति होए : "जयतु मंगळ मंगळा परम मंगळरुपा" हे जति ओळगवीति : बाइसांसि : आठै सात्वीक प्रकटेती : स्तंभ : स्वेद : रोमांच : स्वरभंग : वेपथु : वैवर्ण्य : अश्रू : प्रळय : बाइसासे हातिचे पालमांडे थरारीनें देखौनि : गोसावी : म्हणति : वानरेया बाइसांचिए हातिचे पालमांडे धरा गा : भटोबास बाइसंचिए हातिचें पालमांडे धरीति : बाइसे हातांतु हातु सीरुनि नीरांजन करीति : खालि पालमांडे ठेवीति : भटोबास पांच दंडवतें घालीती : बाइसे रास एक दंडवते घालीतें चि असति : गोसावीयासि फोडी ओळगवीति : वीडीया करुनि देति : परि हातिचा कंपू जाए ना : भटोबास मत्र अवसरु : (पुरुषसूक्त) : म्हणति : गोसावी : चुकि लावीति : म्हणति : हां गा एथ कोण्ही सामक नाही : सामक तें एथ वेळां दोनि : तीनि आवर्तिजति कीं : जी जी नाथोबा तीथि वारु जाणविति : यापरि सपूजीत श्री गोसावी आसनी उपवीष्ठ असति : ।।0।।*।। प्रातःकाळ पूजावसर समाप्त ।

उदयाचा पूजाआवसरु जालेयां नंतरे : सपूजीत : गोसावी आसनी उपवीष्ट असति : भटोबास प्रवृत्ति जाणौनि : श्रीचरणी उपाणौ ओळगवीती गोसावी : रायांगणी उभें टाकति : भटोबास आंगी टोपरें सरीसें करुनि

आणीति : दुनीचीया आंगीचीया बाहीया सरिसीया करुनि : एकें वेळें लेववीति : कसेयांसि गांठी पाडीति : श्रीमूगुटीं टोपरे : ओळगवीति : फुटा परावर्ण करीति : उन्हाळे दीस तरि एकू सोगा एकीकडे : एकू सोगा एकीकडे : स्याळे दीस तरि खोल बूंथि घालीति : पाउसाळे तरि वरी चांदोवा धरीति : बाइसें कणीकी तीमीति : तांदुळे भीजों घालीति : वीसदेया सेणि लावीति : पुडुवाटोबा घेति : जाडी सागळ घेति : बाहीरे : एसि : बाईसे कवाड बांधति : कां कोण्ही एकू राखण ठेवीति : गोसावीया पासि एति : गोसावी बाहीरि उभे ठाकति बीजें करीति : दीसा अवलोकीति : अमंगळा असति : तिया मंगळरुपा होति : गोसावी म्हणति खेळों जाइजैल केउतें : कोण्णीं कोण्हींकडे म्हणति : कोण्हीकोण्हींकडेकडे म्हणति : बाहुल्यें भटोबास प्रवृत्ति जाणति : भटोबास : म्हणति : तेउते गोसावी बीजे करीति : भटोबासीं आधीला दीसी एकाधे वीहरणस्थान पाहुनि ठेवीले असे : कदाचीत एमलार्जूनाकडे : कदाचीत छीन्नस्थळीयाकडे : कदाचीत पींडा कडे : कदाचीत ढगाकडे : कदाचीत एकाधें वाळुवंट : तेथ गोसावी : बीजे करीति : बाइसे : आसनरचीति : गोसावी आसनी उपवीष्ट होती : बाइसे पालवे श्रीचरण परमार्जीति : आसनावरी ठेवीति : दुसरा श्रीचरणु पालवे परमार्जीति : आसनावरि ठेवीति : गोसावीया निरुपणाची प्रवृत्ति : तरि निरुपण करिति : नां तरि धांववीति : पव्हवीति : जुंझवीति : दरेदरकूटे बूजवीति : उचें टेंके असति : तीये समस्थळें करविति : पाषाण : फोडवीति : ऐसे नानाविधि वीहार करीति : यापरी एकें कर्में नासीति : तव उब होय : गोसावीयाचे भालप्रदेसी स्वेदाचे बींदुबींदु ऐसे एति : ते मोतीयांचे कण ऐसे मीरवति : गोसावी : तांबोळ परित्यजेति : गुळळा करीति : बाइसे : फोडी ओळगवति : वीडीया करुनि देति : तांबूळ असे ते भक्त जना प्रसादु वाटीति : मठी असे तयाकारणें बाइसे तांबोळ पालवी बांधौनि ठेवीति : बाइसे गोसावीयातें वीनवीति : बाबा आरोगणे उसीरु जाला : मठा बीजे कीजो गा : गोसावी उदराकडे अवलोकीति : मग म्हणति : बाइ : हें मागे ना : कदाचित : गोसावी उगेचि असति : गोसावीयासि जेव्हळी : प्रवृत्ति होए : तेव्हळि बीजें करीति : कदाचित गोसावि भटोबासांचीया खांदावरी लोंबता श्रीकरु : कदचीत खोलबूंथि कदाचीत वरि चांदोबा : धरीति : गोसावी : बीजे करीति : बाइसे : पुढे जाति : आंतु बाहीरि मदू झाडीति : बाहीरीला ओटेयावरि आसन रचीति : गोसावी एति : आंगी टोपरें फेडीति : भटांहाती देति : भट खूंटीये सूकत घालीति : गोसावी लोंबता श्रीचरणी आसन होए : बाइसे

उस्णोदकाची तांब्तौली पालिमांडे घेउनि एति : गोसावी श्रीमुख प्रक्षाळीति : श्रीकर प्रक्षाळिति बाईसे गोसावीयांचा करीं सपूर दाटणा ओळगवीति : श्रीमुख परमार्जीति : श्रीकर परमार्जीति : कदाचित ओलेनि दाटणेनि सर्वांग परमार्जीति : बाइसे गोसावीयासि वीडा ओळगवीति : गोसावी आसनि उपवीष्ट असति : बाइसे : उपाहारु नींफजवीति : तेवीचि पूजाअवसराची आइति होए : बाइसें गोसावीयाचा भालप्रदेसी चंदनाचा आडा रेखीति : मोकळां आक्षेती आंर्चन करिती : धुपटणा [आंगारा] आणीति : तयावरि दसांगु धुप घालीति : बाइसे पांचवती उजळीती : आर्ती करीति : धुपार्ती होए : मंगळार्ती होए : जयतु मंगळ मंगळा : परम मंगळरुपा : हे जती ओळगवीति : बाईसा : आठे सात्वीक प्रकटेति : हातीचे पालमांडे थरारीलें देखौनि : गोसावी भणति : वानरेया बाइसांचीए हातींचे पालमांडे धरा गा : भटोबास पालमांडे धरीति : बाइसे हातांतु हातु सीरुनि नीरांजन करीति : पालमांडे खाल्लि ठेवीति : भटोबास पांच दंडवतें घालीति : बाईसे रासू एकू दंडवते घालीतेचि असति : भीतरिला ओटेयावरि आसन रचीति : आतुं कानवडा लावीति : ताट करीति : गोसावी भीतरी बीजें करीति : आसनी उपवीष्ट होति : गोसावीया : आरोगण होए : बाइसे नींबलोण करीति : तुप भातु कढी : दोनि पोळी तरी चौतकोर : मांडा तरि दीढु : पुरी तरि एकि : कानवटी फेडुनि तुप पिहीति : ऐसी आरोगण होए: साकवतीया : ऐसी आरोगण होए :[1] पाठी ताक भाताची आरोगण होए : गोसावीयाची श्रीमंत सकुमार आरोगण : गोसावीया : गुळळा होए : श्रीकर प्रक्षाळण होए : चंदन ओळगवीति : गोसावी चंदने करुनि दोन्ही श्रीकर उजळीति : असत : गोसावीया कर्पूरा फोडी वोळगवीति : वाडीया करुनि देति : गोसावी : भटांचा हात धरुनि : सतपदीं वेढे करीति : बाइसे ओटा झाडीति : ओटेयावरी पद्मासन असे : तें शयनासन रचीति गोसावी पहुडु स्वीकारीति : बाइसें : भीक्षान्नकाढीति : काला करीति : मूदा करीति : वरि प्रसादु ठेवीति : भक्तजना पांती प्रसादु भोजन होए : मग उचमंढासि जाति : बाइसे चरणसव्हान करीति : गोसावीयासि घडीया च्यारि पहुडु होए : लोंबता श्रीचरणी आसन : बाइसे श्रीचरणी उपाणौ ओळगवीति : गोसावी परीश्रया बीजें करीति : बाइसे : तांब्तौलीए उस्णोदक ओळगवीति : गोसावी उस्णोदकावीणयोग होए: गोसावी : उंचमढा बीजे करीति : तवं ते अन्यवार्ता करीत असति : तरि : गोसावी : राजमढा बीजे करीति : आसनी उपवीष्ट होति : बाइसे पालवें परमार्जीति : आसनावरि ठेविति दुसरा श्रीचरणु पालवे परमार्जिति : आसनावरी ठेवीति : गोसावी भणति : बाई : पोरें अन्यवार्ता करीत असति : बाइसें भणति : बाबा केवि जाणति : बाई : हे तेंथ गेले होते :

भटोबास एति : बाइसे काइसेया नेणो व्यापारा बाहीरि नीगति : बाइसा पासि एति : अजि : गोसावी बीजे न करींतीचि : ते काइ : पोरेंहो तुम्ही अन्यवार्ता करीत होतेति : बाइ : गोसावी : केवि जाणति : बाबाएं तेथ बीजें केले होते : भट मूख्य करुनि : समस्तभक्तजन भीतरि : गोसावीया पासि एति : गोसावी : पूसति : काइ गा : धर्मवार्ता करीत होतेति : इतुलेनि खालोतीया माना घालौनि भुइसीं रेघा काढीति : गोसावी म्हणति : मरा मरा पोरेहो : तुम्हापसि वर ढोरे चांग जेचि खाति : तेंचि रोंवतीति : एथौनि जाइजे : मां एथचियाचि कथ्या वार्ता कीजनिकीं : अन्य वार्तेपासि निद्रा चांग : वरिनीद्रा कीजे : परि अन्य वार्ता न कीजे : सूख : श्रय : शृंघारु : यें तीन्हीं नाहीं ते काइगा गोष्टि ते अरण्यरुदन की : ।। ऐसे नीरुपण होए : एणें नीरुपणेसी ते मागौति जाति : कदाचीत : गोसावी तेथ बीजें करीति : तवं ते उदेयांचे नीरुपण संवादत असति : तेणे संभ्रमें : ते गोसावीया : आलेयांही नेदखति : गोसावी म्हणति : हांगा : हे तुम्हां वीषयत्वेंचि लागौनी ठाकलें : भटांसी नीरुपण होए : भट भणति : जी जी हे मज घरैना : गोसावी भ्रणति : हे अध्रीत शास्त्र कीं गा ।। कदाचित गोसावी : बीजें करीति : गोसावीया आसन रचीति : गोसावी आसनी उपवीष्ट होति : मग : भणति : जीजी : आम्ही ऐसे म्हणों : भट ऐसे भणेति : गोसावी भणति : तुम्ही भणत असा : ते नव्हे : वानरेसु भणत असति तें होए : कदाचीत भणति : तुम्ही म्हणत असा ते नव्हे : वानरेसु म्हणत असति तेंही नव्हें : तें ऐसें होए : भणौनि नीरुपीति : आणि : पूसति कांगा परीसीले : जीजी : पांवो भणा : आणि : ते म्हणति : गोसावी भणति : परीसीले ऐसे वाटत असे : परिसाना : पुढतीं : नीरुपीति : पुढती : पुसति कांगा परीसीलें : जीजी : पांवो म्हणां : आणि : म्हणति : गोसावी म्हणति : आइकीली मातु सांघो जाणा : परि परीसाना : श्रीसूधि नीरुपीति : श्रीसुधि पुसति : कांगा परीसीलें : जीजी पांवो म्हणां आणि : गोसावी भणति : ऐसे होए : आता परीसीले गा : तव भीक्षाअवसरु होए : गोसावी : तेव्हळी म्हणति : भीक्षावारि जाली गा : जीजी : ग्राम वांटीति : संगु पालटीति : भक्तजन भीक्षे जाति : भीक्षाकरुनि एति : झोळीया दूष्टपूता करीति : झोळीया काठीये घालीति : ठेवीति : श्रीचरण लागति : श्रीमूर्ति अवलोकीत बैसले असति : ।।2।। मध्यान्हकाळ पूजावसर समाप्त ।।

भटोबास झोळी काठीयेसि घालुनि ठेवीति : गोसावीचेया श्रीचरणा लागति : नीधिवासेया हाटा जाति :

पूजाद्रव्यें हाठवठीया आणीति : बाइसें : हाती देति : आपण अलंकार गुंफत बैसले असति : गोसावी भोजन तेयां बीजे करीति : भोजन तेयां बाइसें आसन रचीति : गोसावी आसनी उपवीष्ट होती : बाइसे पालवें श्रीचरण प्रमार्जीति : आसनावरि ठेवीति : मग : दृष्टीपूता भक्तीजनाची पांति होए : कदाचीत बाइसा : पदार्थु नीवडीति : गोसावीया आरोगण होए : मग गोसावी मढासि बीजें करीति : तवं सायंकाळ होए : बाइसें पूढा जाति : सडा संमार्जन करीति : चौक रंगमाळीका भरीति : ओटेयावरि आसन रचीति : गोसावीया आठां दीसां क्षौर : चौ दीसा : मादनें : होए : बाइसे गाडू ढाळीति : चोखटें दाटणेनि श्रीमूति दाटीति : बहीरवासू ओळगवीति : फुटा परावर्ण करीति : गोसावी आसनी उपवीष्ट होति : मग : बाइसे गोसावीयाचा : भाल प्रदेशी कस्तुरीचा आडा रेखीति : सर्वांगी यक्षकर्दमाची भोरि देति : श्रीकंठी गळादंडा गळदंडेयासि तिनि भाका : एकी माळ त–ही गळदंडाचि दोनि माळा त–ही गळादंडाचि : सेवंतेयां मोगरेयांची दाट माळ गुंफिति : माजि माजि वान सौरीति : तो गळदंडा श्रीकंठी आळगवीति : श्रीमुकुटी मूकटमाळ : मोकळेयां पूष्पांची पूजा करीति : श्रवणी झूळंबुके बाहुभूषणे : कळीयांचे हातसर : श्रीकरी फुलांचा झेला आळगवीति : बाइसे : धुपटणा आंगारा आणिति : त्यावरि दसांगु धुपु घालीति : उजळौनि आर्ती पालमांडे ठेवीति : गोसवीयां : धुपार्ती होए : मंगळार्ती होए : जयतु मंगळ मंगळा परमंगळरुपा : हे जति ओळगवीति : बाइसासि : आठै सात्वीक प्रकटेति : हातीचे पालमांडे थरारीले देखौनि : गोसावी भणति : वानरेया : बाईसाचेया हातीचे पालमांडे धरा गा : भट बाईसाचीए हातींचे पालमांडे धरीति : बाईसे हातांतु हात सीरुनि निरांजन करीति : पालमांडे खालि ठेवीति : बटोबास पांच दंडवते घालीतेंचि असति : बाइसे : रासू एकू : दंडवते घालीतेंचि असती बाइसे : वीडा ओळगवीति : गोसावी नगरजनासि पाठवणी देति : नीज : कींकर सेवेसि राहाति : बाइसे नाथोबा करवि दूध आणवीति : आळीवां दुधांतु साकर : तुपभात साकर ऐसी गोसावी व्याळी होए : बाइसे : उदक ओळगवीति : गोसावी : गुळळा करीति : श्रीकर प्रक्षाळीति : बाइसे : उदक ओळगवीति : [illegible] : सपूर दाटणा श्रीकरी ओळगवीति : गोसावी : श्रीमूख परमार्जिति : श्रीकर परमार्जिति गोसावी : दोन्ही श्रीकर चंदने परमार्जीति : भटोबास सकर्पूरा फोडी ओळगवीति : बटोबास श्रीकरी चंदन ओळगविती : वीडी करुनि देति : बाईसे पद्मासन असे तें सयनासन रचीति : गोसावी आसनी उपवीष्ट होति : भटोबास : बाइसे : जेऊं बैसति : कांही पदार्थु आला असें : तरि भटोबास बाइसांतें

भणति : बाइ घेया : बाइसा काही पदार्थु आला असे : तरि बाइसे भटोबासांते भणति : नागदेया घेया : गोसावीयाचां प्रसादु असे : तो दोघे वांटुनि जेवीति : मग : गोसावी : मटांप्रति परावर नीरुपण करीति : नीरुपण करीतां भटोबांसि जाडय ये : तरि : गोसावी : सागळेचेनि उदकें : सींपवीति : वातीचे तेल सरे : तरि नारीएलीचे तुप घालवीति : एकदीं नीरुपण होत असे : भटोबासा जाडय आलें असें : बाइसे : कोण्हा व्यापारा गेली होती : तीयें आली : बाइसे भणीतले : बाबा नागदेयासि जाडय आलें असे : तरि बाबा हे कोणाप्रति बोलत असति : सर्वज्ञे म्हणीतलें : बाई : एथ प्रवृत्ति जाली तरी : स्तंभा एकातें नीमीत्य करुनि बोलीजैल : ।। म्हणौनि : श्रीकरे स्तंभू त्राहटीला : एकूदीं नीरुपणे होत होते : बाइसे : कोण्हा व्यापारा गेली होती : तीए आली : तवं नीरुपण जालें : बाइसें : भणीतलें : बाबा हे नीरुपण नाइकलेचि : असे : बाइ : वानरेसांते पूसा : भटोबास : गोसावीया : पासि बैसले असति : बाइसें भटोबासांते पूसों लागली : भटोबास बोलो लागले : बाइसें भणीतलें : हां बाबा हें ऐसे होए : सर्वज्ञे भणीतलें : बाइ : हा काइ आपुलें बोलैल : हा एथचेंचि बोलेल की : ।। एकूदीसू नीरुपण करीतां : भटोबासी भणींतले : जीजी पाहालें असें : एथौनि तुम्हां पाहलेचिं बहुत : यावरि : गोसावी : पुरुषांची गोष्टि सांघीतली : कोण्ही एकू राओ : पुरुषाचीये भेटी आला : आपुला पाइकू परीवारु : बाहीरी राहविला : आपण वीडा हाती घेऊनि भीतरि आला : तवं तेया । पुरुषांची काष्टी लागली असे : तथा टाळी लागली असे : काष्टी भंगैल : मग : वीडा वाइन : नमकारु करीन : भणौनि राहीला : युगे गेली : काष्टी भंगली : वीडा वाइला : नमस्कारु केला : मग : नीगाला : तेही भणीतलें के नीगाले : ना पाइकू परीवारु : बाहीरि उभा असे : तेहीं भणीतलें : तें युगाचे गेले नव्हे : या उपरि : बाइसी भणीतलें : जीजी : ऐसे ते आमचे बाबाचि होति : गोसावी उगेचि होते : एकी वासना : मानीले : एवं सायंकाळीचा पुजावस्वरु समाप्त ।।*।।

*****

## परिशिष्ट – 3

### मूर्तिज्ञान संहिता

अव्यक्ता श्रीमूर्तिधार्या ईश्वराचें ज्ञान ते कैसे : ना : तें ऐसें नव्हे : जें नीर्वेव नीराकारु असे : तो सावएव साकारु होए : श्रीमूर्तिधार्या होए : श्री : भणीजे : माया : तिए माएचा वेखू स्वीकारीती : कां पा : जे सर्वज्ञें भणीतलें : सृष्टीमध्ये परमेश्वरु अवतरिती ।।1।। मनुष्यवेखधार्ये होति ।।2।। मायावेखधार्ये होति ।।3।। मायापुरधार्ये होति ।।4।। मायानीर्मितं पुरं मायापुरं ।।5।। माया घटकारें आकारें वोते ।।6।। नख चर्म रोमादि करुनि सूद्ध चैतन्यचि ते ।।7।। मायापुरी माएसि अभिमानु ।।8।। ब्रह्मांडी शक्ती अधिनु शक्ती व्यापारु : मायापुरी ईश्वरा अधिनु शक्तीव्यापारु ।।9।। मायापुरी इतर शक्ती तुल्य माया ।।10।। ऐसेया मायापुराते स्वीकरीति : जैसा भींगानया आंतु दीपू लावीजे : आणि बाहीरि प्रकटे : ऐसा ईश्वरु नीर्वेव नीराकरु असे : तो सावेबू साकारु होए : ते कां पाः ना : गोसावी म्हाइभटांते भणीतलें : नीर्वेव नीराकरु असे : तो सावेवू साकारु होए : ऐसी आवधी पूर्वी उच्चारीली ।।11।। द्वापरी श्रीकृष्ण चक्रवर्ती क्षेत्रीयांचा कुळी : यादवांचा वंसी : वसूदेवापासौनि देवकीएचा गर्भी : उभयदृश्या : अवतारु स्वीकरीलला : गोकुळी बाळलीला : वीज्ञानशक्ती खेंळीनलें : पाठीं ज्ञानशक्ति स्वीकरीली : द्वारावतीए अवस्थान चक्रवर्तीवेखें क्रीडा : ऐसा उपाधि स्वीकारीला : अनंत पवाडे केले : अनंते चरीत्रे केली अनंता लीळा केलीया : अनंता जीवांते उद्धरीलें : तया श्रीकृष्ण चक्रवर्ति गोसावीयांचे चरण शरण ।।1।। मातापुरी श्री दत्तात्रए प्रभु : गोसावी : ऋषीकुळीं अत्री पासौनि अनुसएचां गर्भी चतुर्युगो उभएदर्श्या अवतारु स्वीकरीला : कां पा : जे : सवीं भणीतलें : श्री दत्तात्रए प्रभु चतुर्युगी अवतारु स्वीकरीला : कां पा : जे : श्रीदत्तात्रेयप्रभुचा उभएदर्श्या अवतारु : सैहाद्री अवस्थान : नानावेखें क्रीडा : अनंते चरीत्रे केली : अनंता लीळा केलीया : अनंता जीवाते उधरीले : श्रीदत्तात्रेया प्रभु गोसावीयांचे चरण शरण ।।2।। फलेठाणी स्त्रीआग्रहो नीमीत्यें : मातापुरा बीजें करणें : तेथ सैहाद्री : श्रीदत्तात्रए प्रभुचीया प्रवृत्ति आधिकारण : व्याघ्रनीमीत्से : श्रीचांगदेवो राऊळ : गोसावी : दवडुनि : अवरदर्श्या अवतारु स्वीकरीला : रामे.।। गर्भाचाचि अवतारु : द्वारावतीए अवस्थान : अवधूतवेखें क्रीडा : आनतें चरीत्रें केली : अनंता जीवातें उधरीलें : तयां श्रीचांगदेवो राउळा गोसावीयाचे चरण शरण ।।3।। रीद्धि पुरप्रांती कानवसाखे : श्रीप्रभु : अवतारु स्वीकरीला : सन्यासवेखें द्वारावतीए गमन : श्रीचांगदेवो

राउळा गोसावीया क्रीडा करीता द्वीतीए कारण : सुर्पनौमीत्ये श्री गुंडम् राऊळ गोसावी : परदर्शयत्व स्वीकारीले : ऋद्धिपुरी अवस्थान : नीर्विकल्प बाळक्रीडा अनंते चरीत्रै केली : अनंता लीळा केलीया : अनंता जीवाते उधरीले : तया श्रीगुंडम राउळा गोसावीयांचे चरण शरण ।।4।। द्वारावतीए कामख्या नीमित्यें पुर त्योजीलें : गुजरातेचेया प्रधानपुत्राचें पतीत उठउनि : श्री चांगदेवी राउळी : गोसावी : अवतारु स्वीकरीला : ते चापेगौर राजस : तेजस वेल्हाळ श्रीमुर्ति : सुकुमार : ध्वज : वज्र : अंकुज : पद्म : अंकुशांकित : श्रीचरण : सुहरण :वोहरत : जंघायुगळ : घणी पीटिलीया जैसिया मांडीया : चौरसू धनवटू : बरवा जघन प्रदेशू : सखोल नाभिरंध्र : वळीत्रए शोभाएमान : सलक्षणीक समतट दोंद : मृदुतररोमराजा : सरळत ओहरत बरने अजान बाहु : सुरंग कोमळ : सरळ नासापुट : सरळ सुप्रसन्न : आकर्णवीशाळ : कृपालोचन : सुरेखा भवै : डावऐ भवै वरि कांदि : उचे कपौळें : लंबकर्ण : नीतळ नीडळ : बरवा मनोहर श्रीमुगुट : वरीसा पंचवीसा : सतावीसा भीतरि दीसे वए : ऐसें सर्वांग सुंदरु : लावण्य : सौभाग्य : आथीली : श्रीमूर्ति : महावाक्या जे गुणधर्म सांघीतले : तेंही गुणधर्मीयुक्त : द्यूतक्रीडा औदास्य स्वीकारु : तेथ रिद्धीपुरी : श्रीप्रभूचीया प्रवृत्ति त्रीतीए कारण : रांधवण हाटीं सेंगुळें : बुड्ड्डें नीमीत्यें उभए शक्तीचा स्वीकारु : गोसावी : एथ संपूर्ण अवतारु : पूर्वीचीया पांचै लीळा आठवावीया : अवस्था स्वीकारें कांतीए गमन : चतुर्थीए कारण : प्रतीष्ठानी स्वीकरीलें : बाइसा भेटि : निर्गुण प्रेमदान : भटादीकां केवळ ज्ञानदान : श्रीदत्तात्रण प्रभु आदिकारण : गोसावीया अनिएत अवस्थान : भिक्षुवेखें उभए गंगातीरी क्रीडा : अनंते चरीत्रे केली : अनंता लीळा केलीया : अनंता जीवांते उद्धरीलें : तया : श्री चांगदेवो राउळा गोसावीयांचे चरण शरण ।।5।। ऐसी ज्ञान शक्ति : विज्ञानशक्ति : वेध वेधशक्ति : बोध बोधशक्ति : वैखरी पराशक्ति : उभएदर्शत्व : दया : मया : कृपा : कारुण्य : प्रवृत्ति : नीवृत्ति : परावरा वरदानी ऐसा व्यक्त : सर्व शक्तीयुक्त : ईश्वर : श्रीचक्रधरु जाणीजे : यातें मूर्तिज्ञान बोलीजे : ऐसा परमेश्वरु : तयांचे नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा : देहपर्यंत आठवीजें : ध्याइजें : तै या संवसारापासौनि मुंचीजे : कोरडे अनुष्टीजे तरि मोक्ष होए : ना तेंचि आर्तिपुर्वक अनुष्टीजे तरि प्रेम होए : तरि मुर्तीची भावना श्यान ते कैसे : ना : एसें नव्हें : गोसावी लखूदेवोबातें भणीतलें : हे तुम्हां श्रुत की दृष्ट : श्रुत भणीजे आइकलें : दुष्ट भणीज देखीले : तरि : श्रुत श्रीमुर्ती कैसी भावीजें :

ध्याइजे : आणि : देखीली श्रीमूर्ती कैसी आठवीजे : आता श्रुत श्रीमुर्तिची भावना : आणि ध्यान तें कैसे : जे कांतीए श्रीचांगदेवो राउळां गोसावीयां शिष्यां भेटी ।।1।। आणि : धानाइ : आख्याइ का श्रवण ।।2।। आणि : रेमनाइका अवस्वरु कथन ।।3।। आणि मूर्तिप्रकासे राउता विस्मयो ।।4।। आणि : पाटवधां राहीयां भेटी ।।5।। आणि : हिरवळीए वाएनाएका भेटी नामकरण ।।1।। श्रीचरणऐसे भावीजति : ध्याइजति : जे यकांकी डावेनि श्रीचरणें सोळांतळावरि उदक घालीति ।।1।। आणि : महादाइसांचे आंगचुरणें ।।2।। आणि : भटां : क्षेउर ।।3।। आणि : लाहामाइसा : ज्वरीं : पडिताळणें ।।4।। आणि : पुरुषोत्तम देवी पागडे : ओळगवणें ।।5।। आणि : गोसावी : पस्यातपाहारी : परीश्रया बीजे करीति ।।6।। यावरि उदेयाचा पुजावस्वरु आठवीजे : जेतुलीही श्रीचरण प्रक्षाळणे तेतुलीही आठवीजति ।।7।। श्रीचरणीचा आंगुठा ऐसा भाविजे : ध्याइजे : जें : सीमुगा सींपणे ।।1।। आणि : उमाइसा नमस्कारे आंगुठा लावणें ।।2।। आणि येंत्रासनापूर्वक : माहादेश्रमाची पुजा स्वीकर ।।3।। आणि उर्णपटनएनी मार्कंड चोरी प्रकटिए करणें ।।4।। आणि पौंळी सीळा वाणें ।।5।। आणि : सांडोबा बांधणे ।।6।। श्रीचरणेया आंगोठेयाचे नख ऐसे भाविजे : ध्याइजे : जें : रावसगांवी कामाइसा भेटी नामकरणें ।।7।। जानुवीभाग ऐसे भावीजति : ध्याइजति : जे : भटां लखुबाइसां भांडण ।।1।। आणि : भांडारेकारा देहावसान ।।2।। आणि सोभागांकरवि केळ खाववणें ।।3।।4।। गुडघा ऐसा भावीजे ध्याइजें : जें रुसले देव बूझाउं धाडणें ।।1।। मांडिया ऐसीया भावीजति : ध्याइजति : जें ससक रक्षणें ।।2।। देवो कोंप क्षेद क्षीण माहादाइसा देवगुरु नीरुपण : ।।3।। जघनप्रदेसु ऐसा भावीजे : ध्याइजे : जें क्षुद्रानदी सेतु बांधणें ।।1।। आणि : गदोनाएकाची जायावस्त्रपूजास्वीकारु ।।2।। आणि : गोसावीया : खडकुलीए सीमगां : उभे घाटीया मेघवर्णी पाग वेढीली ।।3।। आणि : एळापुरी भक्तांसी खेळु : ।।4।। आणि : एकांकी कटी प्रदेसीं सूडा वेढीला असे ।।5।।7।। उदर ऐसें भावीजें : ध्याइजें जें : अस्वमूळीं : इंद्रोपाहारी : इंद्रिया दैवप्रशसा : ।।1।।8।। वक्षस्थळ ऐसें भावीजे : ध्याइजे : जे : महात्मा नामपूर्वक कुमारी खाजें देववणें : ।।1।। आणि : सर्वज्ञए पतन ।।2।। आणि दोपाहाराचा पुजावसरु आठवीजें ।।9।। श्रीकर ऐसे भाविजति : ध्याइजति : जें भक्त : भणीतली : आजानबाहु ।।1।। आणि : देवा : भटां : भेटि ।।2।। यावरि जेतुलीही क्षेमालिंगने तेतुलीही आठवीजति ।।3।। आणि : पींडु स्पर्श ।।4।। आणि : बाइसे बाहुभूषणें कळेयाचे हातसर बोळगवीति ।।5।। आणि : नागाराउळी कनेरवनें वोळगवीली ।।6।। आणि : छाया गोपाळीचीया बाइया दोरे बोळगवीले ।।7।। आणि : जात्यंधक्रीडे

लघुत्व प्रकटीए करणें।।10।। श्रीकरकमल ऐसे भावीजति : ध्याइजति : जे : रायेरी पाणीपात्र ।।1।। पंचकौळाचार्या ग्रहोनीवृत्ति ।।2।। आणि : भांडारेकारा भेटी ।।3।। आणि : घोडाचुडी सीष्याभेटी ।।4।। आणि : पाटिसाळे वाउनी साधा पाणीपात्र देणे ।।5।। भोंती सारंगपंडिता श्रीकर देणें ।।6।। राणाइसां श्रीकरु देणे ।।7।। आणि : कुष्टीधर्म नीरुपणे ।।8।। आणि : इंद्रोबा तुळसी वाणें ।।9।। आंगोळिया ऐसीया भावीजति : ध्याइजति : जे गदोनादकाची पुजास्वीकारु ।।1।। आणि छाया गोपाळीचीया बाइया : मूदिया वोळगवीलीया ।।2।। आणि तारांगुळी क्रीडे महादाइ प्राश्चित देणे ।।3।।12।। आंगोठा ऐसा भावीजे : ध्याइजे । जे साधा क्षीरीभोजनपुर्वक टीळा तांबुळ माळ दान ।।1।। आणि : मार्गी गोपाळभोजन दाखवणे ।।2।13।। करांगुळी ऐसी भावीजे : ध्याइजे जें ।। ताकवताची भाकवताची भाजी वाढवणे ।।1।। विसैए देवी कमळीं पुजा ।।2।। आणि : बोरीए : लाखाइसां : राणाइसां भेटी ।।3।। आणि : कणेरी गुरुभक्ति दाखवणे ।।4।। आणि अवधूता ब्रम्हप्रकासौका ।।5।। आणि : पेहरासगमी रामाइसांदर्शनकृत नारीएळ गोळाकथन ।।6।।14।। श्रीकंठ ऐसा भावीजे ध्याइजे : जें : नागाराउळीं वाघनख सरी वोळगवीली : आणि : सायागोपाळाचीया बाइया सांखळे ओळगवीले ।।2।। आणि : बाइसे प्रतिदीनि गळदंडा वोळगवीति : ।।3।। आणि : साधा प्रसन्न होउनि माळ दीधली : ।।4।। आणि पर्वि दाइंबासि दीधली ।।5।। यावरि जेतुलाही गळदंडे तेतुलेली आठवीजति : ।।6।।15।। श्रीमुख ऐसें भावीजें : ध्याइजें : जे आउ वरप्रदान ।।1।। आणि : साधा अभएदान : ।।2।। आणि : साधां प्रश्ने दर्शना पुढारु : ।।3।। आणि : कानसे ब्राम्हणा अनुव्रजनी वरप्रदान ।।4।।16।। दंतपक्ति ऐसी भावीजे : ध्याइजे : जे : पर्वी दाइंबा भेटी : ।।1।। आणि : घोगरगांवी महाजना भेटी ।।2।। आणि : बाइसे : प्रतिदीनी सालींका ओळगवीति ।।3।। आणि : राकेया लक्ष्मीधर भटा : गंडोकोदक प्रसाददान ।।4।। यावरि जेतुलीहीं श्रीमुख प्रक्षाळणें : तेतुलींही आठवीजाति ।।5।।17।। नासापुट ऐसे भावीजे : ध्याइजे : जें माहात्मा नीर्गमनीं साके उपहासु ।।1।।18।। श्रीनेत्र : ऐसे भावीजति : ध्याइजति : जें आवैसी दीठि उतरणे ।।1।। आणि : माहादाइ नेत्रदीपानुवाद : आणि : भक्तातें अवलोकुनि प्रेम दीधले ।।4।। आणि : बाइसा : प्रेमकळिका : संचरीली ।।5।। आणि प–हीवा सर्वा सन्निधान देणे ।।6।। आणि : सर्पदष्ट अवलोकुनि माळी रक्षीला ।।7।। आणि : नीखंब माड अवलोकणे ।।8।। आणि : आसनी वादन वाथारादि परीहासू ।।9।। यावरि जेतुलीहिं अवलोकनें तेतुलींही आठवीजति ।।19।। भवं ऐसीया भावीजति : ध्याइजति : जे : आउसीं कांदि पूसणें ।।1।। :

।।20।। कर्णयुगुळ ऐसे भावीजति : ध्याइजति : जे : भक्त भणति लंबकर्ण ।।1।। आणि : नागा राउळी नादीए वाळगवीले ।।2।। आणि : छाया गोपाळाचीया बाइया अनंत वोळगवीले ।।3।। आणि बाइसे प्रतिदिनी झळंबुकें वोळगवीति ।।4।।:।।21।। लल्हाट ऐसे भावीजे : ध्याइजे : जे : बाणेबाइया भेटि ।।1।। आणि : चौबारा : महदाइसा भेटी ।।2।। आणि : माइतेया हरीने पत्रवेली रेखीली ।।3।। आणि : बाइसे : गोपीचंदनाचा उर्धपुंड टीळा रेखिति ।।4।। आणि : चींचोडीए साधांचा टीळे प्रश्नु ।।5।। यावरि जेतुलींही टीळे तेतुलीही आठवीजति ।।6।।22।। आणि श्रीमुगुट ऐसा भावीजे : ध्याइजे : जे : आउस्वानहननीं श्रीमुकुट धरणे ।।1।। आणि : श्रीमुगुटीं टोपरें वोळगविती ।।2।। आणि साधां, मौळिमाधुर्यें कृतप्रसाददान ।।3।। आणि : बाइसे श्रीमुगुटी मुगुटमाळा वोळगवीति ।।4।। यावरि : वीळवचां पूजावस्वरु आठवावा ।।23।। ऐसी श्रीमुर्ति सर्वव्यापक : ईश्वरा श्रीचक्रधराची भावीजे : ध्याइजे : मग : तयाचे गुण विशेखण कीजेति : आगाध श्रीचक्रधरु बाबा : अनिमीत्त बंधु श्रीचक्रधरु बाबा : अनाथनाथ श्रीचक्रधरु बाबा : कृपाळु श्रीचक्रधरु बाबा : मोक्षदाता श्रीचक्रधरु बाबा : कैवल्यदाता श्रीचक्रधरु बाबा : रक्ष गा जी : ईश्वरा : कारुण्या : अवतारा : ऐसा कै डोळां देखीजसि : आपुलेनि दर्शने : संभासणे : माते : अपवीत्रा पवीत्र करावे : जी ऐसी आर्ति करावी : परि : नीर्वेदपुर्वक : मग : ते आर्ति : परमेश्वरु : श्रीचक्रधरु पुरवीति : तेचिं केवि : ना : लेकुरवाळीए मातेचेनि दृष्टांते : तेंचि केवि : ना : सर्वज्ञे भणीतले आर्तातें परमेश्वरु वाडोवाडी गीवसिति : भणौनि : मुर्तीचे ज्ञान होआवें : कां पा : गोसावी : आउसांप्रति : वाकमु दीघमू अनुवाद : ऐसे हो नेदावें : आणि : नामाचें ज्ञान होआवें : कां पां : जें : आमर्दक तपोधना देवताअज्ञान ऐसें हो नेदावे : आणि : लीळेचे ज्ञान होआवें : आचारु की वीचारपरु ऐसे जाणावें : कां पा : जें : चक्रवाका अनुवादे गुरुशीष्या आज्ञान ऐंसे ही नेदावें : भणौनि : आचारा वीचारा चतुर्वीधा स्मरणाचे ज्ञान होआवे : मग : वीचारुनि आचरीजे : स्मरीजे ते गोसावीयांचा लेखी लागे : प्रमाणशून्य ते : न : लगे : जैसी देवाची जाति : जैसीया देवताचीया उडीया : जैसी म्हाइंभटाची पानें : जैसी मार्कडांची भीक्षा : जैसा नाथोबाचा तांदुळजा : जैसी दुसरीया कठीयाची क्रीया : भणौनि : जीए काळीचा जेतुला बीधि : तो तेतुला जातिगुण आचरावा : गोसावीयांचा लेखी लागे : तेचिं कां पां : जे सर्वज्ञें भणीतलें : तयाचे उठणे बैसणे इतुलेहीं वायां न वचें वीचारुनि आचरीजे : स्मरीजे : एवं मूर्तिज्ञान संपूर्ण समाप्त ।।*।।

# परिशिष्ट – 4

"नामाचे दाहा ठाय" संहिता

अर्थात

## नामस्मरणाचे श्रेष्ठत्व.

"साकारपासौनि नाम : मूर्ति : नीराकारापासैनि लीळा चेष्टा भणौनि : साकारानीराकारा नामचि कारण : पाहाट गान भाट धाडिवे नाम उच्चारीति : आणि : देयावें : मग ऐसें उपजें : तैसें : ईश्वर : ब्रम्ह्वीद्या नीरुपीति : तेव्हळि आधी नाम सांधेति : तें नाम उचारीलें दृपदाउसीं : जै कौरवी अवकळा केली : ते कौरव तेणें नामेंचि संहारीले : तेणे नामें दुवासेया सिख लाविली : जैं पांडवातें सापूं आला : तै तेणे नामें आपुलेया ऐस्वर्याचा टीळा सारिला : भणौनि : साकारासि ढळो चळों न ए : आणि : नीराकारासि संहारु करुं नै ए : जवं ज्ञानिया वर्ते तवं : तेणें नामें : वीश्वचैतन्यासि सीख लावीली : जै आनंद क्रकटला : तै तया लाजा प्रतौनि : मूख न पाहेचि : ऐसे नाम वेधवंत : भणौनि : नामें वेधु ।।1।। नामें बोधु ।।2।। नामें अनुशरण ।।3।। नामें स्मरण ।।4।। नाम सकळ नीरोध परीहरी ।।5।। नामे वाजत वारा धरी ।।6।। नामे पडते आकास धरी ।।7।। नाम एतें वीघ्न हरी ।।8।। नाम साह्यातें करी ।।9।। नाम प्राप्तितें करी ।।10।। तरि : नामें वेघू केवि : ना : हीवरळीये लखूदेओबासीचीए लीळेचेनि न्यायें : ते कवि : ना : सुक्षेत्राचेनि दृष्टांतें : तेचि केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें : एथचेया नामापासौनि वेधु : का : स्थानापासौनि : वेधु : भणौनि : नामें वेधू ।।1।। तरि : नामें बोधु : केवि : ना : डोमेग्रामी छीन्नपापी म्हाइंभट भटोबासांचीए लीळेचेनि न्यायें : तेचि केवि : ना : हस्तीचेनि दृष्टांते : तेचिं केवि : ना : सर्वज्ञे भणीतलें : बोध आणि बोधशक्ति ते येथौनिचि की गा : भणौनि : नामें बोधु ।।2।। तरि नामें अनुसरण केवि : ना : डोमेग्रामी देमाइसा कुष्टधर्म नीरुपणें : ते लीळेचेनि न्यायें : हेचिं केवि : ना : कुष्टियाचेनि दृष्टांते : तेचि केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें देओ माझा : मी देवाचा : ऐसेया होइजो कां देमती : भणौनि : नामें अनुसरण ।।3।। तरि : नामें समरण केवि : ना : भींगुरुटीएचेनि दृष्टांते : तेचिं केवि : ना सर्वज्ञे भणीतलें : एक दोनि वेळ आठवीजे : परि : वंध्यू दिवसू जाओ नेदीजे : भणौनि : नामें स्मरण ।।4।। तरि : नाम सकळ नीरोध परीहरी : केवि ना : रीधपूर मार्गी दाइंबा मौन्य वीहीले ते लीळेचेनि न्याचें : तेचि केवि : ना : ब्रह्मचर्या घोडेयाचेनि दृष्टांतें : तेचिं केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें : परिच्छेदी प्रवर्तलेया पुरुषाचे सकळही नीरोध नेणो कोण नीरपौनि फेंडी : भणौनि : नाम

सकळे नीरोध परीहरी ।।5।। नाम वाजत वारा धरी : केवि : ना : रीणाइताचेनि दृष्टांते : तेचिं केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें : ना भीया हो साधे हो : तुम्हांवरि : वाजत वारा धरी ।।6।। तरि : नाम पडतें आकास धरी : केवि : ना : पेहरासंगमी रामाइसांचीए लीळेचेनि न्याये : तेचिं केवि : ना : दंदीयाचेनि दृष्टांते : तेंचि केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें : धर्माचीया चाडा रायाची राणी कां न ए : वरिपडतें आकाश धरीजैल : भणौनि : नाम वरिपडते आकास धरी ।।7।। तरि : नाम एते वीघ्न परीहरी : केवि : ना : बेलोपुरी : माहादाईसाचीये जाडय प्रसंगी ते लीळेचेनि न्यायें : तेचि केवि : ना : लेकुरवाळिये मोतेचेनि दृष्टांते : तेचि केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें : पोरा जीवासि : आग्रहो जरि असे : कोपरा पान्हावो ए : भणौनि नाम एतें वीघ्न परीहरी ।।8।। तरि : नाम साह्याते करी : केवि : ना : जोगेश्वरी : साधाचीए लीळेचेनि न्याचे : तेचि केवि : ना : घासाचेनि दृष्टांते : तेचि केवि : ना : सर्वज्ञें भणीतलें : बाइ : नामी अभिमानु आति कीं : भणौनि : नाम साह्याते करी ।।9।। तरि : नाम प्राप्तीते करी : केवि ना : द्वापरी अर्जुनदेवाचीए लीळेचेनि न्याये : तेचिं केवि : ना : सर्वज्ञे भणीतलें : द्वापरी श्रीकृष्णचक्रवर्ती अनंत उधरीले : परि : उद्धवार्जुन हे पुराण प्रसिध : भणौनि नाम प्राप्तिते करी ।।10।। तें नाम उचारीलें : चांगदेओ भटीं वाळवंटी तेणे आकर्षीला ईश्वरु : पासि : आला : तें नाम उचारीलें : साधी गंगे बुडतां : तेणे नामेचि तारीली : देवता सेळीयेनि वेखे दाइंबापाठी लागली : ते सेळीया क्षौमापासौनि नामेचि राखीलें : सरालां आउसी नाम आइकीले : उचारीलें : तेणे घडला अवीध परीहरला : वीपरीत बुद्धि जाउनि थोरी आली : तया स्थानाची सवे सांडिली : स्वाभावाचा त्यागु केला : ईश्वरु सानुकुळ होउनि साउमे आले : दर्शना सन्निधानां योग्य जाली : ऐसें नाम साह्य करीतें जाले : ते नाम रुक्मीणी आउसीं आइकेतु खेओ अष्टभागाचा त्यागु केला नामाचीया अवस्था हातीची पानें पळवा जाली : अन्यथा ज्ञानें हडपीणीसि कोपली : नामांचेनि जाप्ये प्रवृत्ति भंगैल : भटोबासी भणीतलें : ते जरि नाम उचारीता देवगिरीचा नीनाथा : तरि : तरि तयाचे अभीष्ट चुकते : आणि : ईश्वराची प्रवृत्ति भंगती : नाम आठवीजें : स्मरीजें : ध्याइजें : तैचि या सवंसारापासौनि मूंचीजे : भणौनि : भटोबासी भणीतलें : ऐणे अवतारे जो नुधरे : तो काहीचि नुधरे : ।। ।। एवं नामाचे दहा ठाय संपूर्ण ।।".

*****